# भारतातील किमंत वाढीची प्रवृत्ती, कारणे आणि परिणाम

**डॉ. सिद्धार्थ हरिदास मेश्राम**
सहयोगी प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग)
भ्रमणध्वनी क्रमांक – 9970779085
Email Id. - siddhmeshram@gmail.com

**प्रास्ताविक:**

भारतात सध्या किमंत वाढ ही सर्वात गंभीर समस्या ठरते आहे. अर्थात, या समस्येला तशी दीर्घकालीन पार्श्वभूमी आहे. त्यामुळे, प्रस्तुत शोध निबंधात प्रामुख्याने किमंत वाढ म्हणजे काय? तीचे मापन कसे करतात? भारतातील किमंत वाढीची प्रवृत्ती कशी आहे? त्याची कारणे काय? या सर्व बाबींचा उहापोह करण्यात आला आहे. या शोध निबंधाच्या विश्लेषणाकारीत मुख्यतः द्वितीय साधन सामग्रीचाच वापर करण्यात आला आहे.

प्रथमतः हे लक्षात ठेवावे की, ठोक किंमत देशानांकाच्या आधारावर स्फीती किंवा किंमतवाढ किंवा भाववाढ (Inflation) व्यक्त केली जाते. या किंमतवाढीस काही प्रसार माध्यमातून 'चलन वाढ' हा शब्द वापरला जातो, तो तत्त्वतः चुकीचा आहे. कारण चलनवाढ म्हणजे अर्थव्यवस्थेतील चलनात (Currency) होणारा विस्तार किंवा वाढ होय; परंतु येथे जी वाढ (किंवा घट) झाली आहे ती वस्तू व सेवांच्या सामान्य किंमतीत (Prices) झालेली आहे. या किंमत वाढीची जी विविध कारणे असतात, त्यावरून स्फीती किंवा किंमत वाढीचे विविध प्रकार सांगता येतात. उदा. मागणी-कर्षक स्फीती, (Demand Pull Inflation) व्यय-प्रेरित स्फीती (Cost Push Inflation) इत्यादी.

अर्थशास्त्रात ज्या विविध संकल्पना महत्त्वाच्या आहेत त्यात स्फीती वा किंमतवाढ ही महत्त्वपूर्ण संकल्पना समजली जाते. स्फिती कशी मोजली जाते? तिचे अर्थव्यवस्थेवर आणि वेगवेगळया गटांवर उदा. गरीब व्यक्ती, मजूर, श्रींमत वर्ग, औद्योगिक श्रमिक इ. वर कोणते परिणाम होतात? अशा बाबींना व्यवहारात महत्त्व असल्याने ही संकल्पना व्यावहारिकदृष्ट्या महत्त्वाची ठरली आहे. अर्थव्यवस्थेत जी विविध आर्थिक धोरणे अमलात आणली जातात त्यात मौद्रिक धोरण हे विशेष करून किंमत वाढ नियंत्रित करण्यासाठी वापरले जाते. विकास प्रक्रियेत मिश्र अंतर्गत उत्पादात, रोजगार पातळीत वाढ करणे हे उद्देश साध्य करतांना किंमतीमध्येही वाढ होत जाते. किंमत वाढ पूर्णतः थांबविणे शक्य नसले तरी ती नियंत्रित करता येते.

**स्फीतीचे मापन :**

किंमतीत सतत होणारी वाढ म्हणजे स्फिती होय. स्फिती किंवा किंमत वाढीमुळे देशातील मुद्रेचे मूल्य घटत जाते. उदा. 'क्ष' या वस्तूची किंमत प्रती नग किंवा मात्रा 20 रू. आहे. म्हणजेच 20 रू चे वस्तूत व्यक्त होणारे मूल्य 'क्ष' वस्तू होईल किंवा 1 रू चे मूल्य 1/20 'क्ष' वस्तू होईल. 'क्ष' वस्तूची किंमत वाढून प्रती नग 25 रू. झाली तर 1 रूपयाचे मूल्य हे 1/25 'क्ष' वस्तू होईल, म्हणजे हे मूल्य घटले (1/25 ही संख्या 1/20 पेक्षा लहान आहे). किंमत वाढ ही वस्तू व सेवांच्या किंमतीमधील सरासरी प्रवृत्ती दर्शविते. जर किंमतवाढ 10 प्रतिशत झाली तर याचा अर्थ प्रत्येक वस्तू किंवा सेवेची किंमत 10 प्रतिशतने वाढली असा होत नाही. कारण काही वस्तूंच्या किंमती 150 प्रतिशतने तर काहींच्या 6 प्रतिशतने किंवा 4 प्रतिशत वाढल्या असतील.

विविध वस्तू सेवांच्या किंमतीत जी वाढ होते ती सामान्य प्रवृत्तीच्या स्वरूपात व्यक्त केली जाते. त्यासाठी विविध वस्तू व सेवांच्या किंमती विचारात घ्याव्या लागतात. जेव्हा ठोक किंमतीमधील बदल मोजले जातात व त्यासाठी ठोक किंमतीचा विचार केला जातो व त्यावरून ठोक किंमत देशनांक तयार करतात. किंमत देशनांक तयार करतांना ज्या विविध वस्तू व सेवा विचारात घेतल्या जातात त्यांना उपभोग खर्चात सारखेच महत्त्व नसते. त्यामुळे प्रत्येक वस्तू व सेवांना विशिष्ट भार दिल्या जातो. भार निश्चित करण्याची प्रक्रिया बरीच जटील असते.

आणखी एका मुद्याचा विचार केला पाहिजे. ज्यावेळी आपण म्हणतो की 'क्ष' ची किंमत 10 प्रतिशत वाढली तेव्हा अन्य व्यक्ती म्हणेल की नाही किंमतीत जवळपास 30 प्रतिशत वाढ झाली आहे. आश्चर्याची बाब ही की दोघांचेही म्हणणे बरोबर असू शकेल! 'क्ष' वस्तूची किंमत 10 प्रतिशत वाढली असे म्हणणाऱ्या व्यक्तीच्या मनात त्या वस्तूची 2008 ची किंमत असेल. म्हणजे 2008 मध्ये असणारी किंमत 50 रू. आज 55 रू. झाली म्हणजे 10 प्रतिशतने वाढली. तर दुसरी व्यक्ती 2006 ची वस्तूची किंमी 45.50 रू. होती असे मनात ठेऊ आजची किंमत (रू.55) 20 प्रतिशतने वाढली असे म्हणत असेल. आजच्या सोन्याच्या किंमती दुप्पट झाल्यात असे म्हणणणाराही बरोबर आहे आणि त्या दहापट झाल्यात असे म्हणणारा ही बरोबरच आहे. फक्त दोघांनी तुलनेसाठी वेगवेगळ्या वर्षाच्या आधारभूत किंमती विचारात घेतल्या आहेत. त्यामुळे किंमतवाढ ही नेहमी आधारवर्षाच्या (Base Year) किंवा (Base period) कालखंडाच्या संदर्भात व्यक्त केली जाते हे लक्षात घेतले पाहिजे.

**स्फितीचे मापन  दोन पद्धतीने केले जाते-**

1. ठोक विक्री किंमत निर्देशांक (Whole sale price index- WPI) – ह्यामध्ये वस्तूंच्या किंमतीत होणाऱ्या बदलाची घोषणा वाणिज्य मंत्रालय महिन्यातून एकदा करते.

2. ग्राहक किंमत निर्देशांक (Consumer price index- CPI) – ह्यामध्ये भूतकाळातील दर आणि वर्तमानकाळातील दर यांच्यावरून महागाई दर मोजला जातो. समजा मागच्या वर्षी पाण्याच्या बॉटलचा दर 20 रुपये होता आणि या वर्षी त्याच बॉटलचा दर 30 रुपये आहे, तर महागाई वाढली असे समजावे.

किंमत वाढ किंवा घटीमधील प्रतिशत बदल मोजण्यासाठी ठोक किंमत देशनांक आधारभूत साधन म्हणून स्वीकारले जातात. सध्या जे ठोक किंमत देशनांक प्रत्येक आठवड्याला प्रसिद्ध होतात आणि वर्षातील सर्व आठवड्यांच्या आधारावर सरासरीने वर्षाचा ठोक किंमत देशनांक मोजला जातो. पूर्वी  प्रसिद्ध होणाऱ्या ठोक किंमत देशनांकाचे आधार वर्ष १९९३-९४ होते. यानंतर 2004-2005 हे वर्ष आधार वर्ष झाले; सध्या 2011-12 हे आधार वर्ष मानल्या जाते. म्हणजे 2011-2012 च्या किंमतीचा देशनांक १०० मानावा लागेल. त्यानुसार वेगवेगळ्या वर्षांचे व आठवड्याचे ठोक किंमत देशनांक सांगता येतील. ठोक किंमत देशानांक तयार करण्यासाठी ज्या विविध वस्तू व सेवांचा (697 वस्तूंचा) अंतर्भाव केला जातो, त्याचे तीन गट केले जातात. पहिल्या गटाला 'प्राथमिक वस्तू गट' म्हटले जाते. यात तांदूळ, गहू, डाळी, दूध, फळे, मासे, अंडी, तेलबिया इ. वस्तूंचा समावेश होतो. दुसऱ्या गटात इंधन, वीज, अशा सेवांचा अंतर्भाव होतो. तिसऱ्या गटाला 'निर्माणी वस्तू गट' म्हणतात. या गटात उद्योगात निर्माण झालेल्या वस्तूंचा समावेश होतो. ठोक किंमत देशनांक करतांना या तीन गटांना वेगवेगळे भार दिले जातात. पहिल्या गटात २२.०२ एवढा भार असून दुसऱ्या गटाला दिलेला भार १४.२३ असून सर्वाधिक ६३.७५ एवढा भार तिसऱ्या गटाला दिला आहे. या सर्व भारांची बेरीज अर्थातच १०० असते.

याव्यतिरिक्त भाव वाढ मोजण्यासाठी ग्राहक किंमत निर्देशांकाचा (Consumer Price Index) देखील वापर केला जातो. ग्राहक स्तरावरील महागाईचा दर काढण्यासाठी अशा निर्देशांकाचा वापर मजूर, शेतकरी, कारागीर यांचा मजुरी दर व महागाई भत्ता ठरविण्यासाठी ग्राहक किंमत निर्देशांक काढतांना वस्तू व सेवा असा दोन्हीचा विचार करतात. ग्राहक किंमत निर्देशांक हा प्रत्यक्ष नागरिकाला तोंड द्याव्या लागणाऱ्या परिस्थितीचा आरसाच असतो. त्यामुळे त्याला 'जीवन निर्वाह व्यय निर्देशांक' (Cost of Living Index) असे म्हणतात. सध्या या निर्देशांकाच्या आधारे

अमेरिका, इंग्लंड, जपान इत्यादी विकसित देशांमध्ये भाववाढ मोजली जाते.

**भारतातील किमंततील बदलाची प्रवृत्ती:**

भारतात अलीकडे भाववाढ किंवा महागाईची समस्या गंभीर होत असली तरी ती दीर्घकाळापासूनची मोठी समस्या आहे. अशा परिस्थितीत, हे जाणून घेणे देखील महत्त्वाचे आहे की, स्वातंत्र्यानंतर भारतातील महागाईचा इतिहास काय आहे? कोणत्या वर्षांत किमंत वाढ जास्त कष्टप्राय ठरली आहे आणि कोणत्या दशकात लोकांना महागाईपासून दिलासा मिळाला. भारतातील किमंत वाढीच्या चढ उतारातील सांख्यिकीय माहिती पुढील तक्ता क्र. १ मध्ये सविस्तर दर्शविण्यात आली आहे.


**तक्ता क्र. १**

**भारतातील महागाईचा दर व त्यातील वार्षिक बदलाची प्रवृत्ती**

| वर्ष | महागाईचा दर (%) | वार्षिक बदल | वर्ष | महागाईचा दर (%) | वार्षिक बदल | वर्ष | महागाईचा दर (%) | वार्षिक बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1960 | 1.78% | -0.08% | 1981 | 13.11% | 1.77% | 2002 | 4.30% | 0.52% |
| 1961 | 1.70% | -0.08% | 1982 | 7.89% | -5.22% | 2003 | 3.81% | -0.49% |
| 1962 | 3.63% | 1.94% | 1983 | 11.87% | 3.98% | 2004 | 3.77% | -0.04% |
| 1963 | 2.95% | -0.69% | 1984 | 8.32% | -3.55% | 2005 | 4.25% | 0.48% |
| 1964 | 13.36% | 10.41% | 1985 | 5.56% | -2.76% | 2006 | 5.80% | 1.55% |
| 1965 | 9.47% | -3.88% | 1986 | 8.73% | 3.17% | 2007 | 6.37% | 0.58% |
| 1966 | 10.80% | 1.33% | 1987 | 8.80% | 0.07% | 2008 | 8.35% | 1.98% |
| 1967 | 13.06% | 2.26% | 1988 | 9.38% | 0.58% | 2009 | 10.88% | 2.53% |
| 1968 | 3.24% | -9.82% | 1989 | 7.07% | -2.31% | 2010 | 11.99% | 1.11% |
| 1969 | -0.58% | -3.82% | 1990 | 8.97% | 1.90% | 2011 | 8.91% | -3.08% |
| 1970 | 5.09% | 5.68% | 1991 | 13.87% | 4.90% | 2012 | 9.48% | 0.57% |
| 1971 | 3.08% | -2.01% | 1992 | 11.79% | -2.08% | 2013 | 10.02% | 0.54% |
| 1972 | 6.44% | 3.36% | 1993 | 6.33% | -5.46% | 2014 | 6.67% | -3.35% |
| 1973 | 16.94% | 10.50% | 1994 | 10.25% | 3.92% | 2015 | 4.91% | -1.76% |
| 1974 | 28.60% | 11.66% | 1995 | 10.22% | -0.02% | 2016 | 4.95% | 0.04% |
| 1975 | 5.75% | 22.85% | 1996 | 8.98% | -1.25% | 2017 | 3.33% | -1.62% |
| 1976 | -7.63% | 13.38% | 1997 | 7.16% | -1.81% | 2018 | 3.94% | 0.61% |
| 1977 | 8.31% | 15.94% | 1998 | 13.23% | 6.07% | 2019 | 3.73% | -0.21% |
| 1978 | 2.52% | -5.78% | 1999 | 4.67% | -8.56% | 2020 | 6.62% | 2.89% |
| 1979 | 6.28% | 3.75% | 2000 | 4.01% | -0.66% | 2021 | 5.13% | -1.49% |
| 1980 | 11.35% | 5.07% | 2001 | 3.78% | -0.23% | 2022 | 6.50% | 1.37% |

स्रोत: Data basis: International Monetary Fund, World Bank and OECD Inflation CPI Indicator.

आलेख क्र.१




स्रोत: Data basis: International Monetary Fund, World Bank and OECD Inflation CPI Indicator (doi: 10.1787/eee82e6e-en)

**किमंत वाढ कशी होते?**

वस्तूची किंवा सेवेची किंमत त्या वस्तू व सेवेच्या मागणी पुरवठ्यावरून ठरत असते आणि जेव्हा पुरवठ्यापेक्षा मागणी अधिक असते तेव्हा वस्तूच्या किमती वाढतात आणि मागणी पुरवठ्यातील हे अंतर जितके जास्त तेवढ्या किमती वाढत जाऊन महागाई वाढते. मागणी पुरवठ्यात अशी विषमता निर्माण होण्यास अनेक आर्थिक तसेच आर्थिकेत्तर आणि मानवनिर्मित कारणे जबाबदार असतात. ती महागाई किंवा किंमत वाढीचे कारणे असतात.

वरील तक्यावरून असे लक्षात येते की, भारतातील किमंत वाढीचा जो काही अनुभव आला त्याचा आढावा घेतल्यास 1974 मध्ये झालेली किमंत वाढ ही भयावह स्वरुपाची व सर्वाधिक असल्याची दिसून येते.

**स्वातंत्र्य पूर्व व स्वातंत्र्य नंतरचे दशक :**

भारताला 1947 साली स्वातंत्र्य मिळाले आणि त्यावेळी 50 च्या दशकात महागाईचा दर सुमारे 2% होता. 1950 च्या दशकात शेतीच्या उत्पादनाची वाढ आणि वारंवार पडणा-या दुष्काळामुळे धोरणकर्त्यांना स्वातंत्र्याच्या सुरुवातीच्या दशकांत भाववाढीच्या संकटातून मार्ग

काढण्यासाठी फारच कमी कालावधी मिळाला. एप्रिल 1953 पासून उपलब्ध असलेल्या आकडेवारीवरून असे लक्षात येते की, एक वर्ष किंवा त्याहून अधिक काळ दोन अंकी किमंत वाढ व त्याची कारणेही वेगवेगळी होती. त्यावेळेच्या परिस्थितीने अर्थव्यवस्थेवर आघात केल्याने नागरिकांना महागाईचा सामना करावा लागला होता. दुष्काळ, युद्धे ते चलन अवमूल्यन आणि जागतिक वस्तूंच्या वाढत्या किंमतींमुळे, अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तुंसाठी इतर देशांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहिल्याने (त्यावेळच्या आकेडवारीनुसार भारताची 82 टक्के लोकसंख्या आणि धान्यांचे 75 टक्के उत्पादन असे प्रमाण होते) स्वतंत्र भारतात एप्रिल 1956 ते फेब्रुवारी 1957 दरम्यानच्या 11 महिन्यांत घाऊक बाजारात दोन अंकी चलनवाढीचा पहिल्यांदा सामना करावा लागला. 2010 सालच्या भाषणात आरबीआयचे तत्कालीन कार्यकारी संचालक दीपक मोहंती यांनी या चलनवाढीचे खापर सलग दोन वर्षे दुष्काळाशी आणि कृषी उत्पादनात झालेली घट यांच्यावर फोडले होते. हा हरित क्रांतीपूर्व काळ होता. जेव्हा उत्पन्न स्थिर झाले होते तेव्हा सरकारकडून किंमतीचे समर्थन सुद्धा नव्हते. परंतु 1950 ते 60 दरम्यान, महागाई दरात चढ-उतार होत राहिला आणि 1956-57 दरम्यान औद्योगिकीकरणाच्या उपाययोजनांमुळे तो 13.8 टक्क्यांपर्यंत वाढला. पण या दशकाच्या शेवटी हा दर पुन्हा ३-७ टक्क्यांवर आला.

**1960 च्या दशकातील युद्धाचे परिणाम:**

स्क्रिप बॉक्सच्या अहवालानुसार, 1960 नंतर महागाई दर सुमारे 6 टक्के राहिला. यादरम्यान भारताला 1962 मध्ये चीन आणि 1965 मध्ये पाकिस्तानशी युद्धही करावे लागले होते. तसेच 1965 साली दुष्काळ पडला. पुढे मार्च 1966 ते नोव्हेंबर 1967 दरम्यान 21 महिन्यांचा प्रदीर्घ काळ होता. मागील वर्षाप्रमाणे 1966 हे देखील दुष्काळी वर्ष होते आणि त्यातही भारतीय रुपयाचे अवमूल्यन झाले, त्यामुळे आयातीवर अधिक खर्च करावा लागला. त्यामुळे अधिक किमंत वाढ झाली होती. याचा आर्थिक विकासावर आणि औद्योगिकीकरणावरही मोठा परिणाम झाला. 1965 च्या सुमारास महागाई शिगेला पोहोचली होती आणि युद्धामुळे वस्तूंच्या किमती खूप वाढल्या होत्या. तथापि, सन 1969 पर्यंत ते स्थिर झाले आणि त्याला कृषी क्षेत्राचा चांगला पाठिंबा मिळाला. कारण हरित क्रांतीमुळे महागाई नियंत्रणात आली.

**1970 मधील परिस्थिती :**

70 चे दशक हे महागाईच्या अनिश्चिततेच्या दृष्टीने सर्वात गोंधळाचा काळ होता. 1970 च्या दशकात महागाई सरासरी 7.5% होती आणि 1973 च्या पहिल्या तेलाच्या धक्क्यादरम्यान 1974 मध्ये आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमती 250 टक्क्यांहून अधिक वाढल्या

होत्या. हे असे दशक होते जेव्हा स्वातंत्र्यानंतर प्रथमच 1973-74 मध्ये महागाईने 20% ची मर्यादा ओलांडली होती. तेलाच्या आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबित्व असल्याने देशातील तेलाचे दर खूप वाढले होते. कच्च्या तेलाच्या किमती खाली आल्यावर 1979-80 मध्ये महागाई नियंत्रणात आली.

**1980 मध्येही महागाई हे संकट :**

सरकारच्या विस्तारित वित्तीय धोरणांमुळे आणि त्याच्या मुद्रीकरणामुळे त्या वेळी महागाई या पातळीवर होती हे ज्ञात आहे. यानंतर वित्तीय तूट वाढली आणि यावेळी अधिक नोटा छापण्याचे निर्णय घेण्यात आले. तथापि, 1980 च्या दशकात आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या आंशिक उदारीकरणानंतर, परकीय खात्यातील असमतोल कायम राहिला.

**1990 मधील परिस्थिती :**

हे दशक सर्वाधिक महागाई दर असलेले दशक म्हणून ओळखले जाते.1990-91मध्ये इराकने कुवेतवर आक्रमण केल्याने जागतिक अशांतता निर्माण होऊन तेलाच्या किमंती भडकल्या. फॉरेक्सच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर 1991-92 मध्ये रुपयाचे अवमूल्यन झाले तेव्हा हा काळ नागरिकांना फार कष्टप्राय वाटत होता तसेच सरकारची परीक्षा पाहणारा होता. 1991 मध्ये येथील महागाईचा दर 13.9 वर गेला होता. पण नंतर हळूहळू ते कमी होत गेले.परंतु या दशकात अर्थव्यवस्थेबाबत अनेक महत्त्वाची पावले उचलली गेली, त्यात जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण इ. 1999-2000 मध्ये आर्थिक सुधारणाच्या काळात विविध सेवांच्या किमंती शेतमालाच्या किमंतीच्या तुलनेत जास्त वाढल्यामुळे सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढला होता.

**2000 मधील परिस्थिती :**

जुलै 2008 मध्ये कच्च्या तेलाच्या किंमती प्रति बॅरल $147 वर गेल्यानंतर, 2009 आणि 2010 मध्ये महागाईने दुहेरी अंक ओलांडला. 2008 ते 2013 दरम्यान, जागतिक तेल आणि धातूच्या किमती वाढल्यामुळे महागाई दर वर्षी सरासरी 10.1% होती. अर्थव्यवस्था पुन्हा रुळावर आणण्यासाठी, सरकारने 2008 आणि 2009 मध्ये अनेक वित्तीय प्रोत्साहन पॅकेजची घोषणा केली, ज्यामुळे किमतींवर दबाव निर्माण होऊन वित्तीय तूट पुन्हा वाढली. तथापि, 2014 पासून आर्थिक मंदी आणि GST सारख्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीमुळे महागाईची पातळी खाली आली होती. 2020 मध्ये महामारीच्या काळात महागाई दर 6.6% पर्यंत वाढला.

सध्या देशातील किरकोळ महागाईने उच्चांक गाठला आहे. दिवसेंदिवस वाढत चाललेल्या महागाईने सर्वसामान्य हवालदील झाला आहे. देशातील नियंत्रणात ठेवण्यासाठी

भारतीय रिझर्व्ह बँकेने गेल्या दोन महिन्यांत तीन वेळा रेपो दरात वाढ केली आहे. फक्त भारतातच नाही तर जगातील अनेक देशांमध्ये महागाई शिगेला पोचली आहे. सर्वाधिक महागाई असलेल्या 12 देशांच्या यादीत आता भारताचा समावेश झाला आहे.

जून महिन्याच्या किरकोळ चलनवाढीच्या दरानुसार भारताचा जगातील टॉप 12 देशांमध्ये समावेश आहे. जून 2022 मध्ये भारतातील किरकोळ महागाई 7.1 नोंदली गेली आहे. सलग सहाव्या महिन्यात रिझर्व्ह बँकेने ठेवलेल्या लक्ष्याच्या वर महागाई राहिली आहे.

**कोणत्या देशात सर्वाधिक महागाई:**

जून 2022 मध्ये जगात व्हेनेझुएला या देशात सर्वाधिक महागाई आहे. व्हेनेझुएलामध्ये महागाई 167 टक्के आहे, त्यानंतर तुर्कीमध्ये 78.6 टक्के, अर्जेंटिना 64 टक्के, रशिया 15.9 टक्के आणि पोलंडमध्ये 15.5 टक्के महागाईचा दर आहे. तर ब्राझीलमध्ये महागाई दर 11.9 टक्के आणि स्पेनमध्ये 10.2 टक्के आहे.

**अमेरिकेत महागाई उच्चांकावर:**

जून 2022 मध्ये अमेरिकेत महागाई दर 9 टक्क्यांपेक्षा जास्त आहे आणि 40 वर्षांच्या उच्चांकावर पोहोचली आहे. यूकेमध्ये महागाई 9.4 टक्के, आयर्लंडमध्ये 9.1, पोर्तुगाल आणि स्वीडनमध्ये 8.7, नेदरलँडमध्ये 8.6, युरोझोनमध्ये 8.6 आणि कॅनडामध्ये 8.1 टक्के आहे. इटली आणि मेक्सिकोमध्ये महागाई 8.8 टक्क्यांवर गेली आहे.

भारतात जानेवारी 2023 मध्ये खाद्यपदार्थांचा महागाई दर 5.94 टक्क्यांवर पोहोचला आहे. डिसेंबर 2022 मध्ये महागाईचा दर 4.19 टक्के होता. जानेवारीत खाद्यपदार्थ महाग झाले आहेत. जानेवारी 2022 मध्ये खाद्यपदार्थांचा महागाई दर 5.43 टक्के होता. जानेवारी 2023 मध्ये दुधाचे दर वाढले असून त्याचा परिणाम किरकोळ महागाई दरावर दिसून येत आहे. खाद्यपदार्थांवरील किरकोळ महागाईचा दर बघित असतांना, दूध आणि दुधापासून बनवलेल्या उत्पादनांचा महागाई दर 8.79 टक्के आहे. मसालेही महागले आहेत आणि मसाल्यांचा महागाईचा दर 21.09 टक्के आहे. तृणधान्ये आणि उत्पादनांचा महागाई दर 16.12 टक्के आहे. मांस आणि माशांच्या महागाईचा दर 6.04 टक्के आहे, तर अंडीही महागली असून त्याच्या महागाईचा दर 8.78 टक्के आहे. पालेभाज्या आणि भाज्यांचा महागाई दर घटला असून तो -11.70 टक्के आहे. फळांचा भाव 2.93 टक्के होता. डाळींच्या महागाईचा दर 4.27 टक्के आहे. देशभरात सर्वसामान्यांना सर्वत्र महागाईचा फटका बसत आहे. एकीकडे पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी होत नाहीत, तर दुसरीकडे दैनंदिन वापरातील वस्तूही महाग होत आहेत. दूध, साबण, टूथपेस्ट यांसारख्या दैनंदिन जीवनाशी निगडीत वस्तूंची

किंमतही वाढताना दिसत आहे. जानेवारी 2022 मध्ये या वस्तूंच्या किमती तीन ते 20 टक्क्यांनी वाढल्या होत्या. त्यानंतर कच्च्या मालाच्या किमतीत ही दरवाढ वाढ झाल्याचं सांगण्यात आले आहे. भारतात गव्हाच्या पिठाची किंमतही दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. रिपोर्टनुसार, भारतात गेल्या एका वर्षामध्ये पिठाची किंमत 40 टक्क्यांनी वाढली आहे. सरकारी आकडेवारीनुसार, सुटे पीठ 38 रुपये प्रतिकिलो रुपयाने विकले जात आहे, तर पॅकेजिंगमधील पीठ 45-55 रुपये प्रतिकिलो आहे. निर्यातीवर बंदी असतानाही गहू आणि पिठाच्या वाढत्या किमतींमुळे केंद्र सरकारवर तणाव वाढला आहे.

**किमंत वाढीमुळे झालेले परिणाम:**

**1. आर्थिक असमानतेत वाढ :**

दीर्घकाळपर्यंत किंमती वाढत राहिल्या तर उत्पन्न आणि संपत्तीची विषमता वाढत जाते. स्थिर उत्पन्न असणारे कामगार, सरकारी कर्मचारी, शिक्षक इत्यादी लोकांची महागाईमुळे क्रयशक्ती घटत जाते. याउलट, उत्पादक आणि व्यापारी यांना भरमसाठ नफा मिळतो, ही प्रक्रिया जर ताबडतोब थांबविली नाही तर ज्यांचे रोख उत्पन्न जवळपास स्थिर असते. अशा लोकांची आयुष्यातील संपूर्ण बचत नष्ट होते आणि देशाची संपत्ती व्यापारी आणि उत्पादकांच्या हातात केंद्रित होते. भाववाढ झाल्यास लगेच वेतनदर सुधारल्या जात नाहीत आणि त्यामुळे निरनिराळ्या गटातील कामगारांचे वास्तविक वेतन घटत जाते. महागाईचा सर्वात जास्त तडाखा शेतमजुरांना बसतो कारण ते असंघटित आहेत. त्यांना पर्यायी संधि उपलब्ध नसल्यामुळे त्यांची वाटाघाटीची शक्तीही फारच कमी असते. सामान्यत: त्यांचे रोख वेतन पूर्वापार प्रथेनुसार ठरते आणि पैशाची क्रयशक्ती कमी झाली तरी त्यात बदल होत नाही. या तुलनेत औद्योगिक कामगार आणि सरकारी कर्मचारी यांच्या संघटना मजबूत असल्यामुळे त्यांच्या हितसंबंधांचे संरक्षण होते. महागाई वाढल्याबरोबर काही प्रमाणात तरी त्यांच्या वेतनात वाढ होते. मोठे शेतकरी, उद्योगपती आणि व्यापारी यांचा भाववाढीमुळे सर्वात जास्त फायदा होतो. त्यांच्या हातात संपत्ती एकवटल्यामुळे काही काळ मंदी आली तरी ही व्यापारी गृहे मालमत्ता मोठ्या प्रमाणावर खरेदी करताना आढळतात.

**2. विकासाला अडथळा :**

नियोजनकाळात सातत्याने भाववाढ झाल्यामुळे विकासाला अनेकदा अडथळा निर्माण झालेला आढळतो. योजनेचा नियतव्यय ताठर स्वरूपाचा असल्यामुळे हे घडते. किंमती वाढल्यामुळे योजनेच्या कार्यक्रमाचा खर्च दुरूस्त करणे आवश्यक असते परंतु असे घडत नाही. यामुळे ठराविक काळात विकास प्रकल्प पूर्ण होऊ शकत नाहीत. सतत किंमती वाढत राहिल्यास बचतीही कमी होत जातात. पश्चिम युरोपात बहुतांश

बचत खाजगी निगम क्षेत्रात (Corporate sector) केली जाते. याउलट, भारतात बहुतांश बचत घरगुती क्षेत्रात (household sector) होते. अमेरिका आणि पश्चिम युरोपातील देश महागाईच्या काळात बचत करतात. पुढे गुंतवणूक वाढविल्यामुळे अधिक नफा मिळविण्याची त्यांना आशा असते. याउलट, भारतात बचतीचे वास्तविक मूल्य घटेल या भीतीने बचत करणे टाळतात यामुळे वित्तीय स्त्रोत वाढत नाही आणि पुढे गुंतवणुकीचा दर कमी होतो.

**3. सापेक्ष किंमतींमध्ये बदल :**

किंमती वाढत असताना सर्व वस्तूंच्या किंमती सारख्याच प्रमाणात वाढत नाहीत. भारतात काही वर्षामध्ये शेतमालाच्या किंमती, कारखानी मालाच्या किंमतींच्या तुलनेत अधिक जलद वाढल्या. याउलट इतर वर्षामध्ये कारखानी मालाच्या किंमती शेतमालाच्या किंमतीपेक्षा अधिक जलद वाढल्या. शेतमालाच्या किंमती वाढताना मोठ्या शेतकऱ्यांचा बराच फायदा होतो. भारतात कृषी उत्पन्नाला आयकरापासून सूट मिळते. यामुळे सरकारला विकास प्रकल्पांसाठी या वाढीव उत्पन्नाचा कर किंवा इतर रूपाने फायदा मिळू शकत नाही. पंजाब, हरियाणा आणि पश्चिम उत्तर प्रदेशातील मोठ्या शेतकऱ्यांनी हे वाढलेले उत्पन्न शेतीच्या यांत्रिकीकरणासाठी खर्च केले. यामुळे या राज्यांमध्ये शेतमजुरांची रोजगारी कमी झाली. मोठे शेतकरी श्रीमंत झाले परंतु ग्रामीण गरिबांची स्थिती अधिकच खालावली.

**4. देण्याघेण्याचा आढाव्यावर प्रतिकूल परिणाम:**

दुसऱ्या महायुध्दानंतर सर्व जगातच भाववाढ झाली. परंतु इतर देशांचे तुलनेत भारतात झालेली भाववाढ बरीच जास्त होती. याचा देशाच्या देण्याघेण्याच्या आढाव्याचे दृष्टीने दोन प्रकारचा परिणाम झाला. एक विदेशी बाजारपेठामध्ये भारतीय मालाची मागणी कमी झाली आणि यामुळे निर्यातवाढीचे उद्दिष्ट गाठणे कठीण झाले. याच वेळी देशी बाजारपेठेत नफा अधिक मिळू लागल्यामुळे उत्पादकांनाही निर्यात वाढविण्यात स्वारस्य नव्हते. दुसरे, भारतीय आयात व्यापाऱ्यांना विदेशी वस्तु स्वस्त मिळू लागल्यामुळे त्यांनी आयात वाढविण्याचा प्रयत्न केला. सरकारने अनावश्यक आयात मालावर विविध नियंत्रणे लादली. अलीकडे सरकारने आयातीबाबत उदार धोरण स्वीकारल्यामुळे व्यापारी तूट कमी करणे अधिकच कठीण झाले आहे. भाववाढीमुळे ही परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाल्याचे दिसून येते.

**संदर्भ-**


- जहागिरदार, दि.व्य. (2011). आर्थिक जगत (खंड -3),कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी संचालित, सेंटर फॉर एकॉनोमिक अॅन्ड सोशल स्टडीज, 12, गुलमोहर कॉलनी, कॅम्प, अमरावती.

- देशपांडे, विनायक आणि देशपांडे, श्रीधर (2004). भारतीय अर्थव्यवस्था ,हिमालया पब्लिशिंग हाउस, मुंबई, प्रथम आवृत्ती.
- टिपरसे, अशोक पुरभाजी. (2015). भारतातील भाववाढ परिणाम आणि भाववाढ नियंत्रण Val.-II, Issue-IX, Global Economic Research Journal, ISSN-2249-4081.
- https://data.worldbank.org/indicator/FP.CPI.TOTL.ZG?locations=OE
- https://hindi.news18.com/news/nation/history-of-inflation-in-India-since-1947-to-till-now-4205852.html
- https://scripbox.com/blog/history-of-inflation-in-india-and-what-to-expect-going-forward/